INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 8.031 (SJIF 2025)

# "शिवकालीन नाणी व मुद्रा : एक अभ्यास"

## (Coins and Currency of the Shivaji's period: A Study)

**प्रा.डॉ.आर.ए. चव्हाण**

इतिहास विभाग,
महिला महाविद्यालय,
गेवराई, जि. बीड.
E-mail: rchavan1972@gmail.com

**DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/04.2025-31387187/IRJHIS2504018**

**प्रस्तावना :**

समाजातील दैनंदिन व्यवहारात ऐतिहासिकदृष्ट्या नाण्यास अनन्यसाधारण असे महत्व आहे. पैशाशिवाय आपले दैनंदिन व्यवहार पूर्ण होवू शकत नाही हे आपण सर्वजण जाणतो. अशा नाण्यांचा जन्म केव्हा आणि कसा झाला? त्याचे प्रारंभिक रूप, आकार, प्रकार कसे होते? निरनिराळ्या राजवंशाची नाणी कशी होती, त्यांच्या आकारात व प्रकारात बदल कसा-कसा होत गेला? यासंबंधिचा अभ्यास रंजक असाच आहे. नाण्यांचा आकार त्याचे नांव व वजन त्यावरील आकृती, लेख, नक्षी, बींदू, खूणा, विशेष चिन्हे, त्याचा धातू, त्यामध्ये भेसळ असल्यास त्यामधील भेसळिचे प्रमाण, नाण्याची मुल्ये नाण्यांच्या मुबलकतेवरून व दुर्मिळतेवरून दिसून येणारी त्या-त्या प्रदेशाची राज्याची आर्थिक स्थिती चिन्हांवरून प्रतीत होणारी तत्कालीन समाजाची आवड किंवा भक्ती, लेखावरून समजणारी राजनामे व त्यांच्या काल, त्यांची श्रेष्ठ-कनिष्ठ स्थाने, नाणी तयार करण्याची पध्दती इत्यादीचा अभ्यास म्हणजे 'नाणकशास्त्र' होय. छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्याचा कारभार सुरळीत चालावा म्हणून अष्टप्रधान मंडळ स्थापन केले होते. राज्य चालविण्यासाठी अनुभवी, होतकरू व्यक्तींना त्यामध्ये संधी दिली होती. स्वत: महाराज जातीनिशी प्रत्येक गोष्टीचा आढावा घेत असतं. प्रधान, अर्थ, महसूल, पत्रव्यवहार, सैन्य, परराष्ट्र, न्याय, धर्म इ. वेगवेगळी खाती त्यांनी निर्माण केली होती. राजांनी अष्टप्रधान मंडळाची स्थापना स्वराज्यावर येणाऱ्या सर्व समस्यांवर मात करण्यासाठी केली. हा वैचारिक प्रयत्न होता. सतराव्या शतकात दख्खन देशात ज्यात महाराष्ट्र, आंध्रा, कर्नाटक प्रांत येतात. यामध्ये विविध प्रकारची नाणी प्रचलित होती.

**टाकसाळ :**

सतराव्या शतकात 'एक टाकसाळ' एक नाणे अथवा 'वैद्यचलन' (Legal Tender) ही संकल्पना प्रचलित नसल्याने बाजारात अनेक प्रकारची देशी-विदेशी नाणी येत असत आणि त्यांचे परस्परांतील विनिमयाचे दर ठरविणे हा एक मोठा व्यवसाय होऊन बसला होता. ठराविक मुदतीसाठी खाजगी टाकसाळ काढण्यास काही अटी घालून व्यक्तींना परवानगी दिली जात असे. टाकसाळ काढणाऱ्या व्यक्तीला परवानाशुल्क म्हणून पाडलेल्या नाण्यांचा काही हिस्सा द्यावा लागत होता. संगमेश्वर जवळील बंदरात वीरसेटी आणि हरसेटी या दोन सोनारांनी टाकसाळीसाठी सरकारकडे परवानगी मागितली होती. त्यांना मुख्यत: 'लरी' हे

चांदीचे नाणे आणि 'खुर्दा' म्हणजे तांब्याची चिल्लर नाणी पाडावयाची होती. सरकारने शंभर लाऱ्यांना एक लरी आणि एक मन खुर्द्याला दोन लरी असे परवाना शुल्क आकारून पाच वर्षांच्या मुदतीने त्यांना कौलनामा दिला. मराठी मुलकात आरंभीच्या काळात सरकारी टाकसाळ नव्हती. सरकारी अटीवर ज्यांना टाकसाळ काढावयाचे असेल त्यांना तशी परवानगी दिली जात असे. अशी मुक्तता दिल्याने शिवकाळातील प्रमुख तांब्याचे नाणे 'छत्रपती' अथवा 'शिवराई' याची विविध आकाराची रूपे आपणास आढळतात. अर्थात या नाण्यांवर कोणती अक्षरे कोरावयाची या संबंधी सरकारने टाकसाळीस सक्त आदेश दिले होते. यांचे आकार जरी भिन्न असले तरी अक्षरवाटीका एकच होती.[१]

**शिवकालीन नाणी :**

शिवकालीन महाराष्ट्रात सोन्याची, चांदीची आणि तांब्याची नाणी प्रचलित होती. ही सर्वच नाणी महाराष्ट्रात पाडलेली नव्हती. मोगल, मुस्लीम राजवट, विजयनगरची हिंदू राजवट, पोर्तुगिज, इंग्रज इत्यादी पाश्चिमात्य लोकांनी आणलेली नाणी महाराष्ट्राच्या बाजारपेठेत वापरली जात होती. सभासद बखरीत छ. शिवाजींच्या संग्रहीत असलेल्या नाण्याची एक यादी दिली आहे. त्यात शिवराईहोन, फनम, चक्रम, बादशाहीहोन, लारी, रूपये, अश्रफी, टका, छत्रपती अथवा शिवराई सजगणी, तिरूका, रूका, पैसा, दाम, अडका, चवल, जितल, दुबल, पाव, ब्याल इत्यादी नाण्यांचा उल्लेख आला आहे. सोन्याच्या नाण्यामध्ये मोहर, पुतळी, शिवराई, देवराई, संगरी, गुती, धारवाडी, आडवाणी, चंदावरी इत्यादी अनेक प्रकारचे होन सतराव्या शतकात व्यवहारात होते. होनला पगोडा असे पाश्चिमात्य प्रवाश्यांनी म्हटले आहे. छ. शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर स्वत:चे राज्य स्थापन केल्यानंतर आपल्या नावाने सोन्याची व तांब्याची नाणी पाडली होती. सोन्याची नाणी 'शिवराईहोन' आणि तांब्यांची नाणी 'शिवराई' या नावाने प्रसिध्द आहेत. या नाण्यांवर पुढील बाजूस 'श्रीराजाशिव' आणि मागील बाजूवर 'छत्रपती' असा आलेख उमटविला आहे. हीच नाणी छ. संभाजी व छ. राजाराम यांच्या काळात चालू राहिली.[२]

राज्याभिषेकाच्या वेळी छ. शिवाजी महाराजांनी 'शिवराई' नावाचा होन पाडला होता. हे सत्य जरी असले तरी याबाबतचा उल्लेख कागदपत्रात फारसे आढळत नाहीत. चिंचवड देवस्थानातील काही कागदपत्रावरून शिवराई पुष्कळ असावेत असे काही इतिहासकारांचे मत आहे. परंतु आजपर्यंत शिवराईहोन फारच कमी प्रमाणात आढळले आहेत. या होनाचे वजन दोन मासे सात गुंज अथवा ४२.१२ ग्रेन्स आहे. राज्य व्यवहार कोशात होन आणि त्याखालील नाणी एक कोष्टक दिलेले आहे. १ होन = २ प्रताप, १ प्रताप = २ धरण, १ धरण = २ चवल, १ चवल = २ दुबल आणि दुबलापेक्षा लहान नाण्याचा उल्लेख इतरत्र आढळतो. १ दुबल = २ ब्याल, १ ब्याल = २ निस असे होते.[३]

होनाची किंमत साधारणपणे साडेतीन ते चार रूपयांच्या दरम्यान असे. फनम नावाचे एक लहान सोन्याचे नाणे होते. सामान्यत: ३६ फनमचा एक होन असे. राज्य व्यवहार कोशात 'फनम' म्हणजे 'पण' असे सांगून त्याची गणना चांदीच्या नाण्यात केली आहे. चक्रम हे एक दुसरे सोन्याचे नाणे होते. फनम, चक्रम आणि होन यांचे प्रमाण दिले आहे. १०० होन = १६० चक्रम, १ होन = १६ फनम, १ चक्रम = १० फनम असे होते.[४]

होन हा सोन्याच्या धातुचा होता. त्याचा उपयोग व्यवहारात व सैनिकाच्या पगाराकरिता वापरला जात होता. सोन्याबरोबर तांब्यांचा शिक्काही होता. पैसा छोट्या स्वरूपात व्यवहारासाठी कवडी वापरत होते.[५]

निरनिराळ्या साधनांचे हे प्रमाण भिन्न-भिन्न आढळते. त्याचे कारण त्या नाण्यांचे वजन हे असावे. रूपया, लारी आणि टका ही चांदीची नाणी होती. शहाजारी, अलमगिरी हे मुघली रूपये विशेष प्रचारात होती. अब्बासी नावाच्या एका फारशी रूपयाच्या नाण्याचा सभासदाने उल्लेख केला आहे. अश्रफी म्हणजे पोर्तुगिज नाणे झेरालिन होत. लरी हे चांदीचे नाणे देखील मूळ पर्शियातून

आले. 'हेअरविन' च्या आकारासारखे हे चांदीचे नाणे होते. पर्शियन गल्फमधील लार या भागात हे नाणे प्रथम पाडले गेले. 'शिवराई' अथवा छत्रपती, सजगिनी, तिरूका, पैसा, रूपा आका ही तांब्यांची नाणी होती. रूका, तिरूका, छत्रपती अथवा शिवराई आणि टका याचे प्रमाण पुढीलप्रमाणे होते. ३ रूके = १ तिरूका, २ तिके = १ छत्रपती किंवा शिवराई अथवा सजगिनी, ८ छत्रपती = १ टका अथवा ८ रूके तिरूक्याची किंमत साधारणत: एक पैसा असावी. छ. शिवाजी महाराजांची शिवराई बऱ्याच काळापर्यंत चलनात होती. त्यांची टाकसाळ रायगडावर होती. शिवाजी महारांची नाणी (महाराष्ट्रात चालू असलेले पैसे), कर्नाटकात व तंजावर कडेही चालू होती. शिवछत्रपती सर्ववर्षासने होनाने देत असत. ते सोन्याचे होन फारच कमी होते. पुढे हाच वारसा छत्रपती शाहुने साताऱ्यात एक टाकसाळ सुरू करून 'शाहुशिक्का' नावाचे रूपये पैसे बनविले. कोल्हापूर येथे एक टाकसाळ होती तिथे 'शंभूशिक्का' नामक रूपये निघत. त्यानंतर पेशवे काळात नागोठाणे, माहुली, धारवड इत्यादी ठिकाणी टाकसाळी सुरू झाल्या त्या पेशवाईच्या अखेरपर्यंत चालु होत्या.[६]

**सुवर्ण, चांदी, तांब्याची आणि इतर नाणी :**

शिवकालीन राजाच्या खजिन्यात किती प्रकारची सुवर्णनाणी होती याची एक विस्तृत यादी सभासदाने आपलया बखरीत दिली आहे. याखेरीज प्रवाशांचे वृत्तांत, इंग्रजांचे फॅक्टरी रेकॉर्डस् आणि समकालीन कागदपत्रांतून मराठी मुलखात प्रचलित असलेल्या नाण्याचा उल्लेख केलेला आहे. यात गंभार, मोहर, पुतळी, सणगिरी, शिवराई, पातशाही, देवराई, अच्युतराई, रामचंद्रराई, सलतानी, इब्राहिमी, निशाणी, टिपकी, गुत्ती, धारवाडी, कावेरीपाक, चंदावरी, वेंगुला, वेलोरी, मलयघाटी, पाकनाईकी, आदवणी, जडमाल, कटेराई, ताडपत्री, देवनहाळी, वेंकटपथी, त्रिशुळी, अफरजी, बिलधरी, उलफकरी, मुहमदशाही, रामनाथपूरी, कुनगोटी इत्यादी विविध प्रकारचे होन साध्या सोन्याच्या कांबी, फलम अथवा फनम आणि चक्रम इत्यादी लहान सुवर्ण नाण्यांचा उल्लेख करता येईल. चांदीची नाणी रूपया, लारी आणि टका त्याचबरोबर तांब्याची नाणी शिवराई, सजगणी, विरूका, रूका, दाम, अडका, जितल, बुद्रक ही होती.[७]

**छत्रपती शिवाजी महाराजांची मुद्रा:**

छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक हा केवळ मराठ्यांच्या नव्हे तर संपूर्ण मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील एक अत्यंत महत्वाचा प्रसंग होय. सर्वत्र अंधारून आले असताना अचानक मळभ दूर व्हावे आणि सहस्त्ररश्मीने दशादिशा उजळून टाकाव्यात तसा हा प्रसंग राजांनी या अलौकिक सोहळ्याचे स्मरण रहावे म्हणून 'राज्याभिषेकशक' सुरू केले. स्वत:चे नाव त्याला दिले नाही. सुलतानी आमदनीत फार्सी, अरबी शब्द सर्रास प्रचलित होते. आता स्वराज्यात तेच पुढे रूढ करणे हे स्वराज्यासाठी घातक होते. राजे हे जाणून होते की, भाषेमध्ये विलक्षण शक्ती असते. लोकांच्या संवेदना बदलण्याचे सामर्थ्य भाषेत असते. म्हणून राजांनी संस्कृत शब्द वापरात आणण्याचे ठरविले. संस्कृत- भाषा ही सर्व भाषेंची जननी होती. संस्कृत भाषेत स्वत्वाची बिजे होती. संस्कृत शब्दांचा 'राज्यव्यवहारकोश' राजांनी पंडीत रघुनाथ पंताकडून करवून घेतला. राज्यपत्रलेखाचे असेच नियम केले. आपली राजमुद्रा म्हणून प्रतिपच्चंद्रलेखेव- वर्धिष्णू विश्ववंदिता-शाहसुनो : शिवसैषा मुद्रा भद्राय राजते ही संस्कृत मुद्रानिश्चित केली. आपल्या मुद्रेची सोन्याची व तांब्याची नाणी पाडण्यास प्रारंभ केला.[८]

इ.स. १६४६ पासून छ. शिवाजी महाराजांची स्वराज्याची सुरूवात झाली. त्यात याच दरम्यान सर्व कारभारात लक्ष घ्यावयास सुरूवात केली. इ.स. १६४६ च्या जानेवारीत त्यांच्या स्वत:च्या मुद्रेचे एकपत्र उपलब्ध आहे. ही मुद्रा पुढच्या काळातही छ. शिवाजी महाराजांनी वापरलेली आहे. छ. शिवाजी महाराजांची स्वराज्य स्थापनेविषयी व विकासाच्या कल्पनेची मुहूर्तमेढ यामुळे स्पष्ट दिसते. ही मुद्रा संस्कृत भाषेत असून ती वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्या मुद्रेचा भावार्थ 'शहाजीचा पुत्र जो छ. शिवाजी त्याची ही मुद्रा

आहे. शुध्दपक्षातील प्रतिपदेच्या चंद्रलेखाप्रमाणे (दिवसेंदिवस) वाढत जाणारी व विश्वातील सर्वांना मान्य होणारी ही मुद्रा सर्वांच्या कल्याणासाठी शोभत आहे. या एका मुद्रेत अनेक गोष्टी सूचित केलेल्या आहेत. हे राज्य चंद्रकलेप्रमाणे हळूहळू वाढत जाणार असून या राज्याला सर्वांची मान्यता मिळणार आहे. ही सुरूवातीची कल्पनाच मोठी विलक्षण व आश्चर्य करणारी आहे. छ. शहाजीचा पुत्र म्हणून स्वत:ला संबोधून या मुद्रेत छ. शहाजी विषयी पितृऋण आदर व प्रेम व्यक्त केलेले आहे. सर्वांचे कल्याण साधने हे छ. शिवाजी महाराजांचे ध्येय या मुद्रेत स्पष्टपणे व्यक्त केले आहे. चंद्राचे चांदणे व प्रकाश कोणालाही खुपत नाही. सर्वांच्या नेत्रांना व मनाला आल्हाददायक वाटतो. तसेच या मुद्रेच्या स्वामीत्वाखाली त्यांचे राज्य सर्वांच्या आनंदासाठी, कल्याणासाठी आहे. छ. शिवाजी महाराजांच्या राज्य स्थापनेचे ध्येयवादाचे व चरित्राचे सार या मुद्रेत स्पष्ट व्यक्त झाले आहे.[९]

**निष्कर्ष :**

१) शिवकालात सोन्याची, चांदीची व तांब्याची नाणी प्रचलित होती.

२) नाण्यावरून त्या काळातील आर्थिक, राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक स्थिती कळते.

३) छ. शिवाजी महाराजांची राज्य स्थापना, ध्येयवादी आणि चारित्र या मुद्रेत स्पष्ट झालेले दिसून येते.

**सारांश :**

छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य प्राप्तीनंतर आपल्या वचनाला जागले. त्यांनी गोर-गरिब याचक, सन्याशी, गोसावी, कवी, कलावंत, गुणीजन, मुत्सद्दी, आप्त, सेवकजन, प्रजाजन, अष्टप्रधानमंडळ आणि वीर या सर्वांचा उचित मान राखला. त्यांचा सत्कार केला. मराठी राज्य हे केवळ लष्करी सत्ता नव्हती लुटारूचे राज्य नव्हते, सरंजामशाही नव्हती अथवा वतनाची प्रतिकृति नव्हती तर प्रामुख्याने शेतकऱ्यांचे, सामान्य जनतेचे राज्य होते. असेच निर्धारपूर्वक मानावे लागते. लोकांच्या कल्याणाकडे, राज्याच्या आर्थिक बळकटीकडे विशेष लक्ष पुरविणारा भद्राय राजते अशी राजमुद्रा धारण करणारा मध्ययुगातील एक रचनात्मक कार्य करणारा बुध्दिमान राजा होता हे आपणास मान्य करावे लागते. त्या-त्या काळातील साम्राज्याची आर्थिक स्थिती जाणून घेण्यास नाणी हे महत्वाचे साधन ठरतात. नाणी ही आर्थिक विकासाच्या पायाभूत अंगाचे महत्वपूर्ण सूचक आहेत. राज्याचा विकास आणि ऱ्हास नाण्याच्या अभ्यासातून कळतो. धातुच्या मिश्रणावरून त्या-त्या साम्राज्याची आर्थिक स्थिती कशी होती या बद्दल माहिती मिळते. त्यांची आर्थिक परिस्थिती जाणून घेण्यासाठी नाणे हे महत्वपूर्ण साधन ठरतात.

**संदर्भ सूची :**


१) डॉ. कुलकर्णी अ.रा., शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे, आवृत्ती पाचवी, जुलै-२०१२, पृ.क्र. १६७

२) डॉ. सावंत उत्तम, डॉ. बोरकर र.रा, भारतीय पुरातत्वशास्त्र (तत्व आणि पध्दती), निर्मल प्रकाशन, नांदेड, प्रथम आवृत्ती, जुलै-२००४, पृ.क्र. १५६

३) प्रा. मार्डीकर मदन, मराठ्यांचा इतिहास, विद्याबुक्स पब्लिशर्स, छ. संभाजीनगर, प्रथम आवृत्ती, जून-२००८, पृ.क्र. ४७७

४) डॉ. सावंत उत्तम, डॉ. बोरकर र.रा, (उपरोक्त), पृ.क्र. १५७

५) अमित कुमार, मराठों का इतिहास, डिस्कव्हरी पब्लिशिंग, दिल्ली, प्रथम आवृत्ती, २०१०, पृ.क्र. २००

६) डॉ. सावंत उत्तम, डॉ. बोरकर र.रा, (उपरोक्त) पृ.क्र. १५८

७) डॉ. कुलकर्णी अ.रा., (उपरोक्त) पृ.क्र. १६७

८) सातपुते मनोहर, सातपुते बाबुराव, शिवराय आणि शिवकालीन संदर्भ, ज्ञानेश्वरी प्रकाशन, मुंबई, सातवी आवृत्ती, २०१३, पृ.क्र. ४६

९) डॉ. सावंत उत्तम, डॉ. बोरकर र.रा, (उपरोक्त) पृ.क्र. १५८.